# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

महत्वाचे

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा/ 388 दिनांक : ३०.१.२००१

**तांत्रिक परिपत्रक क्र. :- ६२**

**विषय :** बिडाच्या पाईपच्या संकल्पनात जलदाबाची बिहित मर्यादा..

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या अनेक योजनांमध्ये दाबनलिकांसाठी बिडाचे पाईप प्रस्तावित करण्यात येतात. बिडाच्या पाइपांच्या दाबनलिकांच्या संकल्पनात विचारात घ्यावयाचा बिडाच्या पाईपच्या वर्गवारीनुसार जास्तीत जास्त जलदाब, भारतीय मानक १५३६-१९८९ मध्ये खालील प्रमाणे नमूद करण्यांत आला आहे.

| व्यास मी.मी. | वर्णन | सुचविलेला महत्तम क्षेत्रीय जलदाब मेगा पास्कलमध्ये | सुचविलेला महत्तम कार्य जलदाब, मेगा पास्कल मध्ये (जलप्रहार दाबासहीत) |
|---|---|---|---|
| | | Max.field Test Pr. | Max Working Pr. |
| १. | २. | ३. | ४. |
| ८०-६०० | एस ॲण्ड एस स्पन पाईप वर्ग "एल ए" | १.६ | १.० |
| ८०-६०० | एस ॲण्ड एस स्पन पाईप वर्ग "ए" | २.० | १.२५ |
| ८०-६०० | एस ॲण्ड एस स्पन पाईप वर्ग "बी" | २.५ | १.६ |
| ७००-१०५० | एस ॲण्ड एस स्पन पाईप वर्ग " एलए" | १.५ | १.० |
| ७००-१०५० | एस ॲण्ड एस स्पन पाईप वर्ग "ए" | २.० | १.२ |
| ७००-१०५० | एस ॲण्ड एस स्पन पाईप वर्ग "बी" | २.५ | १.५ |
| ८०-३०० | फलॅन्ज्ड पाईप वर्ग-"बी" | २.५ | १.६ |
| ३५०-६०० | फलॅन्ज्ड पाईप, वर्ग - "बी" | २.० | १.६ |

प्राधिकरणाच्या दिनांक १३.७.९९ चे परिपत्रक क्र.२२ अन्वये वरील प्रमाणेच जलदाब नमूद करण्यात आलेले आहेत. परंतू ब-याच वेळा क्षेत्रीय अभियंते संकल्पनात, जलप्रहार दाबासहीत ( With Water Hammer Pressure ) येत असलेल्या एकूण जलदाबाची तुलना वरील तक्त्यातील रकाना क्र.४ मध्ये दर्शविलेल्या जलदाबाशी न करता रकाना क्र.३ शी करतात. रकाना क्र.३ मधील जलदाब हा क्षेत्रीय जलदाब चाचणीशी संबंधित आहे व या चाचणीत जलदाब हा १ कि.ग्रॅम/वर्ग से.मी/मिनिट या दराने वाढवावयाचा असल्याने या चाचणीत जलप्रहार दाब (Water Hammer Pressure ) विचारात घेणे अपेक्षित नाही. म्हणून वरील तक्त्यात नमूद केल्यानुसार जलप्रहार दाबासहीत येत असलेला एकूण जलदाब हा ८० ते ६०० मि.मि. व्यासांपर्यंतच्या एल.ए., ए व बी वर्गाच्या पाईपसाठी अनुक्रमे १०० मी. १२५ मी व १६० मीटर पेक्षा कमी तर ७०० ते १०५० मि.मि. व्यासापर्यंतच्या एल.ए.,ए व बी वर्गाच्या पाइपांसाठी अनुक्रमे १००, १२० व १५० मीटर्स पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

वरील बाब सर्व क्षेत्रीय अभियंत्यांच्या पुन्हा एकदा निदर्शनास आणून देण्यात यावी व योग्य प्रतीचे पाईप्स् प्रस्तावित करण्यात येतील असे बघावे.

( राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक )

प्रत,
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांस माहितीसाठी.
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नवी मुंबई.
मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे /पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती यांना माहितीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. नवी मुंबई.
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.,
सचिव, म.जी.प्रा. कंत्राटदारांची संघटना, ॲक्वा बीझनेस सेंटर, ॲक्वा हाऊस, पार्वती ओव्हर ब्रीज जवळ, पुणे-४११ ०३० यांना माहितीसाठी.

nng..30.1..

M. J. P.
ISSUED
3 FEB 2001
MUMBAI-21